# रचनात्मक वृत्ति

मनुष्याचा हा स्वभाव आहे कि तो नवनिर्माण करु इच्छितो, काही न काही बनवू इच्छितो. मग लहान मुलाच्या रुपात मातीचा हत्ती-घोडा किंवा लाडू बनवतो तर मोठा झाल्यावर कंपनी-काराने बनवतो. निर्मिती केल्यामुळे माणसाला खुशी होते व समाजाव्दारे त्याला सम्मान मिळतो. या उलट निर्माणतेचे किंवा रचनात्मकतेचे कोणतेही कार्य न केलयास त्याला असे वाटू लागते कि जणू काही त्याचे जीवन व्यर्थ आहे. तो एक बेकार व्यक्ति आहे. त्याचे जीवन जणू काही निष्क्रिय आहे. अशा प्रकारच्या संकल्प-विकल्पांनी त्याला जीवन एक बोझ वाटू लागतो व तो मग उदास राहू लागतो. तो स्वतःस असमर्थ, अयोग्य किंवा भाग्यहीन समजायला लागतो. अशा मनस्थितीत तो चिडचिडा बनतो व छोटया-छोटया गोष्टींवरुन तो लगेच तणावग्रस्त होत राहतो.

तसे पाहिले तर मनुष्यातील रचना किंवा निर्माणतेची वृत्ति काही गैर नाही. मनुष्याच्या या वृत्तिमुळेच तर आज समाजात विविध वस्तु-पदार्थांची विविधता व नवीनता पहायला मिळते. रचनात्मक वृत्ति असल्यामुळेच एका दृष्टीकोणातुन प्रत्येक नर-नारी कोणत्या-न-कोणत्या प्रकारे एक कलाकार किंवा रचनाकारच आहे. कोणी आपल्या विचारांव्दारे एखाद्या योजनेची रचना करीत आहे तर कोणी त्याला साकार रुप देऊन पदार्थ्यांची रचना करीत आहे. परंतु माणसाची हीच रचनात्मक वृत्ति तेव्हा हानीकारक बनते जेव्हा शेतकऱ्याचे नांगर शेतात नांगरण्याऐवजी त्या लोखंडापासून मनुष्य तलवार तयार करतो किंवा डायनामाइटच्या साह्याने डोंगरातुन रस्ता तयार करण्याऐवजी त्याच्या बॉम्ब निर्मितिसाठी प्रयोग करतो. मनुष्य जेव्हा जीवनाला प्रेरणा देणारी कविता किंवा कथा रचण्याऐवजी चारित्रिक पतन, सामाजिक संघर्ष व परस्पर घृणाभाव जन्माला देणाऱ्या साहित्याची रचना करतो.

म्हणून हा भेद जानून घेऊन आता मनुष्याला आवश्यक आहे कि एका नव्या विश्वाची, नव्या समाजाची एका नव्या ढाच्याची ज्याला सतयुगी विश्व म्हणता येईल अशा विश्वाची रचना करण्यात प्रयोग करावे. त्याने अशा एका दैवी समाजाच्या निर्माणतेमध्ये आपली योग्यता व शक्ती लावावी ज्यात पवित्रता, दिव्यता, शांति व उच्च कोटी मर्यादा आहे. यासाठी मात्र त्याने स्वतःला ईश्वरीय ज्ञान, योग व दिव्य गुणांच्या साच्यामध्ये ढाळावे ज्यामुळे प्रथम स्वतःचे ही नव-निर्माण होईल. जेव्हा मानव आपले जीवन अशा योजनेच्या अनुरुप बनविण्यात प्रयत्नशील राहील तेव्हा त्याच्या आनंदाला पारावार राहणार नाही. स्वतःचे जीवन उज्ज्वल व श्रेष्ठ बनताना बघून कुणाला बरे खुशी होणार नाही ? या संसारात उंच-उंच इमारती बनून धरातीर्थी होतात, कारखाने बंद पडतात परंतु रॉकेटाहून उंच जाणारा चरित्राचा झेंडा सदा फडकत राहतो. म्हणून जर काही बनवायचेच असेल तर प्रथम आपले चारित्र अथवा दिव्य जीवन बनवावे. निर्मिती करावी, काही रचना करायची असेल तर सतयुगी दैवी साम्राज्याची रचना करण्यात प्रभुला सह्योग द्यावा व आपली बुध्दिनीच विचारांमध्ये लावण्याऐवजी समाजसेवेच्या नवनवीन साधनांची रचना करावी.

ज्या व्यकतीचा असा दृष्टिकोण असेल किंवा होईल तो प्रत्येकाशी चांगले संबंध बनवील, कोणाशीही नफरत-वैरभाव ठेवणार नाही, तो आपले जीवन घडविणाऱ्या गुणांवर ध्यान देईन व जीवनाची इमारत कोसळविणाऱ्या गोष्टी आत्मसात करणार नाही. अशा परिस्थितीत त्याला तनाव तो काय होणार ?

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com